जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४२०   दिनांक - ०९/०६/२०२३**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

## "हडपसर पोलीस स्टेशन मधील सभागृहाचे उद्घाटन मा.पोलीस आयुक्तांच्या शुभहस्ते संपन्न"

हडपसर पोलीस स्टेशन हे पुणे शहर आयुक्तालयातील सर्वात व्यस्त असे पोलीस स्टेशन असुन पोलीस स्टेशनमध्ये कामाची व्याप्ती पाहता शिवजयंती,गणेशोत्सव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती,पालखी बंदोबस्त इतर सण उत्सवा दरम्यान वेगवेगळया संघटना,मंडळे,तसेच मोहल्ला कमिटी,शांतता कमिटीच्या मिटींग घ्यावा लागतात.पुणे शहरात सर्वाधिक अधिकारी व स्टाफ असलेल्या हडपसर पोलीस स्टेशन मध्ये या सर्वांच्या मिटींगसाठी एक सभागृह असणे अत्यंत आवश्यक होते.या सभागृहाची निर्मितीसाठी गिट्स कंपनी प्रा.लि.व बी.एन.वाय.प्रा.लि.या कंपन्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

दिनांक ०९/०६/२०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता हडपसर पोलीस स्टेशनमध्ये नव्याने तयार करण्यात आलेल्या १२५ आसन क्षमतेच्या सभागृहाचा उद्घाटन सोहळा मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री.रितेश कुमार,यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन पुणे शहर पोलीस दलाचे मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री.रंजनकुमार शर्मा,मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ - ५, पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त हडपसर विभाग,पुणे शहर श्रीमती अश्विनी राख हे उपस्थित होते.तसेच हडसपर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरविंद गोकुळे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.विश्वास डगळे तसेच हडपसर पोलीस स्टेशन मधील सर्व अधिकारी व अंमलदार कार्यक्रमास उपस्थित होते.

प्रास्ताविकात वपोनि अरविंद गोकुळे यांनी पोलीस स्टेशनचा मागील २ वर्षातील कामगिरीचा आढावा सादर केला,त्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत गंभीर गुन्हयात झालेली घट,तपासपथकाने उघडकीस आणलेले गुन्हे व मुद्देमाल निर्गती केले बाबतची माहिती सादर केली. तसेच पोलीस स्टेशन मध्ये नागरिक, व्यावसायिक आणि सर्व पक्षीय राजकिय कार्यकत्यांच्या एकत्रित सहकार्याने मागील वर्षी तुपे सभागृहाजवळ तयार करण्यात आलेली हडपसर पोलीस चौकी,दर्शनी भागात बांधण्यात आलेली कॉमन मॅन वॉल आणि मगरपट्टा सिटी व सिरम कंपनी यांचेकडुन बंदोबस्तासाठी अंत्यंत आवश्यक असलेली एकुण १२५ बॅरिकेट्स,याविषयी पोलीस स्टेशनला कायम सहकार्य करणारे स्थानिक नागरिक,उद्योगपती,सर्व पक्षीय नेते पदाधिकारी,संघटना व पत्रकार यांचे आभार मानले.

समारंभात मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार यांच्या हस्ते बी.एन.वाय.प्रा.लि.चे संचालक मा.श्री.इंद्रजीत सेन गुप्ता व गिट्स कंपनी प्रा.लि.चे जनरल मॅनेजर मा.श्री.पी.पी.कुंडु यांचा सत्कार करण्यात आला. मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार आणि मा.अपर पोलीस आयुक्त श्री.रंजनकुमार शर्मा यांनी सर्वांगीण कामगिरी बद्दल हडपसर पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी व अंमलदार यांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हडपसर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन थोरात यांनी केले.कार्यक्रमास हडपसर पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी,अंमलदार व झोन मधील सर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.


तपास पथक
16
प्रतिबंधक पथक

